आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२१ जून २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- योग ही केवळ शारीरिक कसरत नाही, तर मानवी चैतन्याची अभिव्यक्ती आहे, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- देशभरात योगदिनानिमित्त विविध कार्यक्रम

- नीट फेरपरीक्षा २०२६ ला कडक बंदोबस्तात आणि सुव्यवस्थेत प्रारंभ

- एप्रिल ते १४ जून या कालावधीत देशाच्या निर्यातीत १५ टक्क्यांनी वाढ

**आणि**

- राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरु होणार

**<><><><><>**

१२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस आज भारतासह जगभरात साजरा होत आहे. 'निरोगी वयोवृद्धीसाठी योग' ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना आहे. कोलकाता इथल्या रेड रोड इथं योगदिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला, यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी झाले. प्रधानमंत्र्यांनी योगशिक्षक बनून सोबतच्या हजारो नागरिकांना मार्गदर्शन केलं. योग ही केवळ शारीरिक कसरत नाही, तर मानवी चैतन्याची अभिव्यक्ती आहे, असं ते म्हणाले. योग हा आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग व्हायला हवा, योग सर्वांना जोडण्याचं काम करतो असं म्हणत प्रधानमंत्र्यांनी सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

***होल्ड बाईट मोदी***

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू मध्यप्रदेशात जबलपूर इथं गॅरीसन मैदानावर आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्या.

योग ही शारीरीक, मानसिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठीची साधना आहे, असं **उप राष्ट्रपती** सी. पी. राधाकृष्णन यांनी योगदिनानिमित्त देलेल्या संदेशात म्हटलं आहे. नवी दिल्लीत संसद भवन परिसरात आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात लोकसभा सभापती **ओम बिर्ला** सहभागी झाले होते. परराष्ट्रव्यवहार मंत्री **एस. जयशंकर** नेहरू पार्क इथं आयोजित

कार्यक्रमात सहभागी झाले, यात भारतातल्या नॉर्वेच्या राजदूत मे एलिन स्टिनर याही सहभागी झाल्या होत्या.

**<><><><><>**

मुंबई आणि उपनगरात योग दिनानिमित्त अनेक कार्यक्रम झाले त्यात विविध केंद्रीय मंत्र्यांनीही हजेरी लावली.

ऐकूया एक वृत्तांत...

**व्हीसी**

*मुंबई इथं लोकभवनात भारतीय तटरक्षक दलानं आयोजित केलेल्या योगदिनाच्या कार्यक्रमात* ***राज्यपाल जिष्णूदेव वर्मा*** *यांनी सहभाग घेतला. तटरक्षक दलाचे अधिकारी, त्यांचे कुटुंबीय तसंच लोकभवनातले अधिकारी यात सहभागी झाले. राज्यातल्या सर्व विद्यापीठानी योग साधनेचा प्रचार प्रसार करावा, तसंच उत्तम योग शिक्षक आणि प्रशिक्षक घडवावेत असं आवाहन राज्यपालानीं यावेळी केलं.*

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जुहू चौपाटीवर झालेल्या योग दिन कार्यक्रमात सहभागी झाले होते.*

*केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी बोरिवली इथं आयोजित योग सत्रात सहभाग घेतला.*

*वरळी डोममधल्या सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम इथल्या कार्यक्रमात केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल, तसंच राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सहभागी झाले होते.*

*केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरणानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात योगाभ्यास केला.*

*केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी प्रियदर्शनी पार्क इथल्या कार्यक्रमात योगसाधना केली.*

*याशिवाय आयआयटी बॉम्बे, एनटीपीसीच्या पश्चिम विभाग मुख्यालयानं देखील योग दिन उत्साहात साजरा केला.*

**<><><><><>**

राज्यात ठिकठिकाणी आज योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्तानं आयोजित अनेक नाविन्यपूर्ण कार्यक्रमात मान्यवरांसह सर्व वयोगटातल्या नागरिकांनी सहभाग घेतला.

**सांगली** जिल्ह्यात छत्रपती शिवाजी क्रीडांगण आणि मालू हायस्कूलच्या मैदानावर योग प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली.

**लातूर** शहरात आंबेडकर पार्क इथं विशेष योगाभ्यास कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**नंदुरबार** जिल्ह्यातही अनेक ठिकाणी योगाभ्यास कार्यक्रम झाला. नंदुरबार शहरातल्या पाटील महाविद्यलायच्या मैदानावरच्या सामूहिक योग दिन कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला.

**नागपूर**मध्येही यशवंत स्टेडियमवर सामूहिक योगाभ्यास कार्यक्रम झाला. कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदविला.

**सोलापूर** शहरात आगळ्यावेगळ्या पद्धतीनं योग्य दिन साजरा झाला. या कार्यक्रमात नृत्यनिरंजन संस्थेनं योग आधारित नृत्य सादर करत योग हा नृत्य अविष्कारातूनही करता येतो असा संदेश दिला. या योग शिबीराला सोलापूर पोलिस दलानं संगीत साथ लाभल्यानं त्यांच्या संगीत सुरांनी या शिबीरात वेगळाच आनंद निर्माण झाला होता.

**यवतमाळ**मध्ये योग दिनानिमित्त शंकर डहाके या योगपटूनी विहिरीतल्या पाण्यात योगासनं केली. दहा वर्षांपासून ते नदीत किंवा विहिरीत योगासनं करतात आणि मुलांनाही प्रशिक्षण देतात.

**रत्नागिरीत** योगदिन उत्साहात साजरा झाला. गुजरातमध्ये नुकत्याच झालेल्या जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धेत देशाला सुवर्णपदक मिळवून देणारी तन्वी रेडीज या कार्यक्रमात प्रमुख पाहुणी म्हणून उपस्थित होती.

**जालना** इथं जिल्हा क्रीडा संकुलात आज योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांसह विविध विभागांचे अधिकारी, योगतज्ज्ञ, क्रीडाप्रेमी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात मालवण बंदर जेटी इथं योग दिनानिमित्त योग कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. समुद्रकिनाऱ्याच्या निसर्गरम्य वातावरणात आयोजित करण्यात

आलेल्या या शिबिरात विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेत योगाभ्यास केला.

<><><><><>

वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी नीट फेरपरीक्षा २०२६ आज देशातल्या ५५१ शहरांमधे आणि परदेशातल्या १४ केंद्रांवर सुरु आहे. परीक्षा गैरप्रकारमुक्त वातावरणात व्हावी यासाठी राष्ट्रीय परीक्षा यंत्रणा, एनटीएनं प्रशासनाबरोबर समन्वयानं व्यापक उपाययोजना केल्या आहेत.

अनेक ठिकाणी राज्यशासनातर्फे परीक्षार्थींना केंद्रावर जाण्यासाठी विनामूल्य वाहतूक सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांच्या मदत आणि मार्गदर्शनासाठी तसंच सुरक्षिततेच्या दृष्टीनं आवश्यक कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आला आहे. पिण्याचं पाणी, प्रथमोपचार इत्यादी सुविधाही देशभरात देण्यात आल्या आहेत. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सर्व नीट परीक्षार्थींना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

मुंबईत बेस्ट उपक्रमातल्या कर्मचारी संघटनांनी पुकारलेल्या संपाचा आज तिसरा दिवस आहे. राज्यसरकारने आवश्यक सेवा कायदा लागू करुनही तसंच संप करु नये असा औद्योगिक न्यायधिकरणाचा आदेश असूनही कर्मचारी संघटनांनी संपाचं हत्यार उगारलं आहे. कायम आणि तात्पुरत्या तत्वावरचे कर्मचारी संपात सहभागी झाले असून दररोज धावणाऱ्या २ हजार ७६६ बसगाड्यांच्या जागी संपाच्या पहिल्या दिवशी फक्त ४८ गाड्या धावल्या. काही ठिकाणी बसगाड्यांवर दगडफेकीचे प्रकार झाले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची संपकरी संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर गेल्या शुक्रवारी चर्चा झाली, मात्र त्यात काही तोडगा निघाला नाही. शनिवारी अवघ्या ४ बसगाड्या रस्त्यावर होत्या. बेस्ट चा अर्थसंकल्प महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात विलीन करावा, सातवा वेतन आयोग लागू करावा, कंत्राटी कामगार पद्धत रद्द करावी इत्यादी मागण्यांसाठी बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीनं हा संप पुकारला आहे.

<><><><><>

यंदाच्या एप्रिल ते १४ जून या कालावधीत देशाची निर्यात १५ टक्क्यांनी वाढल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी सांगितलं. गोयल यांनी आज मुंबई इथं चार्टर्ड अकाउंटट्सशी संवाद साधला, त्यानंतर ते बोलत होते. अमेरिकेने भारतावर ५० टक्के आयात शुल्क लावल्यानंतरही भारताच्या निर्यातीत २०२५-२६ या आर्थिक वर्षात वाढ झाली. एप्रिल ते १४ जूनपर्यंत १५ टक्के वाढ झाली असं गोयल म्हणाले. मे महिन्यात भारताची निर्यात सहा महिन्यांच्या उच्चांकी पातळीवर पोहोचून ४५ अब्ज डॉलर इतकी झाली होती, असंही त्यांनी सांगितलं. देशाच्या आयात निर्यातीची विस्तृत आकडेवारी १५ जुलैला वाणिज्य मंत्रालय जाहीर करणार आहे.

<><><><><>

राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरू होत आहे. आज अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दोन्ही सभागृहांचे गटनेते, तसंच ज्येष्ठ सदस्यांना सह्याद्री अतिथीगृहात चहापान तसंच चर्चेसाठी निमंत्रित केलं आहे.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बंडखोर खासदारांपैकी दोन खासदार पक्षाच्या संपर्कात असल्याचा दावा खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या खासदारांना त्यांच्या मतदारसंघातल्या जनतेच्या रोषाची भीती वाटत आहे. जर खासदारांना त्यांची चूक मान्य असेल तर त्यांच्याशी चर्चा होऊ शकते, असंही राऊत म्हणाले. संजय दिना पाटील, संजय देशमुख, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, नागेश पाटील-आष्टीकर आणि ओमप्रकाश राजे निंबाळकर हे खासदार१७ जून रोजी दिल्लीत झालेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बैठकीला गैरहजर राहिल्यानं पक्षांतर्गत बंडाळीच्या चर्चा सुरू झाल्या होत्या.

दरम्यान, ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी मतदारसंघातल्या निकटवर्तियांशी चर्चा केल्यानंतरच आपल्या राजकीय वाटचालीबाबत निर्णय जाहीर करणार असल्याचं सांगितलं आहे.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात दमदार प्रवेश केल्यानंतर लगेचच पाठ फिरवलेल्या मान्सूनच्या पावसाने आज अनेक दिवसांनी हजेरी लावली. सकाळी कडक ऊन होतं; मात्र ११

वाजल्यानंतर ढगाळ वातावरण तयार झालं आणि काही भागांमध्ये पावसाच्या काही सरी कोसळल्या. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वांनाच थोडा दिलासा मिळाला आहे.

**//<><><><><>//**